—: प्रेसनोट :— दि. १७/०२/२०२१

**यातील फिर्यादी व इतर व्यवसायिकांच्या हातगाडयांवर कारवाई करु नये म्हणुन यातील लोकसेवकांनी लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोद.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०६/२०२२ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १) धनंजय सुर्यकांत गोळे, वय ५३ वर्षे, पद वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (अतिक्रमण/निर्मुलन)<br>२) उमेश रामभाऊ शेट्टी, वय ५५ वर्षे, पद—अनुज्ञापन निरीक्षक<br>कार्यालय— के/पुर्व वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, अंधेरी (पुर्व) मुंबई—६९ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ८,०००/— |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ८,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी भाजीपाला विकण्याचा व्यवसाय करतात व त्यासोबत व्यवसायाबरोबर इतर सहकारी भाजीपाला व्यवसायिकांना हातगाडया भाडयाने देण्याचा व्यवसाय करतात. फिर्यादी यांच्याबरोबर इतर सहकारी देखील हातगाडया भाडयाने देण्याचा व्यवसाय करतात.<br>बृहन्मुंबई महानगरपलिका के/पुर्व वॉर्ड कार्यालयातील लोकसेवक क्र. १ यांनी फिर्यादी व इतर व्यवसायिकांच्या हातगाडयांवर कारवाई करु नये याकरीता मासिक रु. ४०,०००/— चा हप्ता ठरवला होता. त्याप्रमाणे माहे जानेवारी, २०२२ मध्ये रु. ४०,०००/— व माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये रु. ३२,०००/— रोख घेतले होते. उर्वरीत रु. ८,०००/— फिर्यादी यांच्या सहकाऱ्याकडुन येणे बाकी असल्याने मागील दोन दिवसांपासुन लोकसेवक क्र. १ यांनी फिर्यादी यांचेकडे तगादा लावला होता. परंतु फिर्यादी यांना उर्वरीत लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई या कार्यालयात लोकसेवका विरुध्द लेखी तक्रार केली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष तक्रारीची पडताळणी केली असता, आलोसे क्र. १ यांनी उर्वरीत लाचेची रक्कम रु. ८,०००/— स्विकारण्याचे कबुल केले. त्याप्रमाणे दिनांक १६/०२/२०२२ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान लोकसेवक क्र. २ यांनी लोकसेवक क्र. १ यांचे सांगणेवरुन फिर्यादी यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्याने लोकसेवक क्र. २ यांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणून दोन्ही लोकसेवकांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

17/02/22

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००